स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पीएच. डी. (इतिहास) पदवीसाठी संशोधनाची रुपरेखा

महाराष्ट्रातील धनगर समाजाचे ऐतिहासीक

अवलोकन - एक अभ्यास

* संशोधक *

ढाले विकास शिवाजीराव

* मार्गदर्शक *

प्रा. डॉ. सावंत यू. एस.

प्रोफेसर तथा विभागप्रमुख

इतिहास विभाग व संशोधन केंद्र

यशवंत महाविद्यालय, नांदेड

सन 2017

* अनुक्रमणिका *

- प्रस्तावना
- समस्या सुत्रन व विषय निवडीचे महत्व
- विषयाची मर्यादा
- विषयाचे पुर्वसंशोधन
- विषयाची उद्दीष्टे
- विषयाची गृहीतके
- संशोधन पद्धती
    - पुर्वीच्या कामांचा आढावा
    - सार्वजनिक अहवाल
    - सर्वेक्षण
    - मुलाखत व इतर पद्धत
- विषय संकलनाचे स्त्रोत
    - प्राथमिक साधने
    - दुय्यम साधने
- प्रकरण योजना
    - प्रकरण पहिले - महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या सामाजिक स्थितीचे ऐतिहासीक दृष्टीकोनातून परीक्षण
    - प्रकरण दुसरे - महाराष्ट्रातील धनगर समाजाची धार्मिक व सांस्कृतिक स्थिती : एक अभ्यास
    - प्रकरण तिसरे - महाराष्ट्रातील धनगर समाजाची आर्थिक स्थिती
    - प्रकरण चौथे - महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास
    - प्रकरण पाचवे - सद्यस्थिती व धनगर समाजासमोरील प्रश्न
- निष्कर्ष / उपसंहार
- संदर्भग्रंथ सूची

“महाराष्ट्रातील धनगर समाजाचे ऐतिहासीक अवलोकन”

प्रस्तावना

कानडी भाषेत ‘दन’ हा शब्द जनावरे या अर्थाने वापरला जातो. जनावरे म्हणजे गाय, म्हैस, मेंढ्या, शेळ्या इ. तसेच कानडी भाषेतच ‘कार’ किंवा त्याचेच रुपांतर ‘गार’ असे आहे. याचा अर्थ पाळणारा असा आहे. म्हणून कानडी भाषेतील या शब्दाचे विश्लेषण केल्यास ‘दनकार’ किंवा ‘दनगार’ हा शब्द होतो व हाच शब्द पुढे रुपांतरीत होऊन ‘धनगर’ असा झाला असावा असे म्हणण्यास मुभा आहे. संस्कृतमध्ये ही ‘धांग’ असा शब्द आहे. ‘धांग’ याचा अर्थ डोंगर, पर्वत असा होतो व डोंगरावर राहणारा जनसमुदाय म्हणजे ‘धनगर’ अशी व्याख्याही काही अभ्यासकांनी केली आहे.

धनगरांना इंग्रजीत एकच व्यापक आशयाचा शब्द Shepherd हा वापरला जातो. ज्याचा अर्थ मेंढपाळ असा होतो. जो मराठी भाषेत धनगर याच नावाने ओळखला जातो. धनगर या शब्दाच्या उत्पत्तीबददल्ल अनेक संकल्पना अस्तित्वात आहेत. त्यातीलच प्रमुख संकल्पना म्हणजे धनगर म्हणजेच धनाचे आगर असा अर्थ प्रचलित आहे. याचे कारण म्हणजे वैदिक कालखंडात पशुधन म्हणजेच संपत्ती मानल्या जात होती. धनाची संकल्पनाच त्या काळात ही होती की, ज्याच्याकडे जास्त पशुधन असेल तो सर्वात श्रीमंत. एकंदरीतच धनगर म्हणजे पशुपालक समुदाय होय. प्राचीन काळापासूनच खेडेगावत अनेक जाती आपापला व्यवसाय करत असत व तेच व्यवसाय परंपरेने चालत आलेले आहेत. या व्यावसायिक जातींनी वस्तूचे उत्पादन करून त्या वस्तू गावातील शेतकऱ्यांना पुरवाव्यात व त्याच्या मोबदल्यात अन्नधान्य मिळवावे असा हा अलुतेदारी-बलुतेदारी गावगाड्याचे स्वरुप होते. अशा प्रकारच्या श्रम विभागणीमधूनच जाती निर्माण झाल्या व जातीसंस्थेला बळकटी मिळाली हे सिद्ध होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी who were the shudras? या ग्रंथात याचे चांगल्या पद्धतीने विश्लेषण केले आहे. जातीसंस्थेच्या उदयासंदर्भात ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळाच्या पुरूष शुक्तात जो उल्लेख आला आहे तो मुख्यत: वर्णव्यवस्थेसंबंधीचा आहे तो असा. ब्रम्हाच्या किंवा विराट पुरूषाच्या मस्तकातून ब्राम्हणांची उत्पत्ती झाली, त्याच्या भूजांमधून किंवा बाहुमधून क्षत्रीय उत्पन्न झाले, कमरेमधून वैश्य निर्माण झाले आणि पायामधून शुद्रांची निर्मिती झाली. जाती संस्थेचे बीज आपल्याला या विवेचनेत दिसून येते. कॉ. शरद पाटील यांनी दास शुद्राची गुलामगिरी यामध्ये याचा सखोल अभ्यास केले आहे. एकंदरीतच जातीची निर्मितीची अवस्थाही आकस्मात घडलेली गोष्ट नाही तर ती

एक प्रदिर्घ चालत आलेली व्यवस्था आहे व त्याच जाती व्यवस्थेचा भाग असलेला घटक म्हणजे धनगर समाज हा या संशोधनासाठी निवडलेले घटक आहे. भारतातील अनेक राज्यात धनगर समाजाचे वास्तव्य पहावयास मिळते. परंतु त्या राज्यांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावाने ओळखल्या जाते ते पुढीलप्रमाणे -

1) आंध्रप्रदेश	-	गरोडी, धंगर, हटकर, धनगर
2) बिहार	-	पाल, थोरीहार, गडरी, गडरीया
3) कर्नाटक	-	कुरवार, भारवाड, गोरवा, धांगर
4) हरियाणा	-	गडरीयाबघे, बरेला, वैर, बिलटा, होरानवाल, कलानालिया पोडनोवाल, पाल, शिवाया इ.
5) जम्मु काश्मीर	-	गड्डी
6) गूजरात	-	भरवाड
7) मध्यप्रदेश	-	धनगर, धंगर, गडारीया, गडदी, हटकर, पाल, पाली
8) उत्तर प्रदेश	-	गड्री, गठेरीया, पाल
9) राजस्थान	-	गडरीया, चंडालीया, गवाला, घोषी, कबीरीया
10)मनिपुर	-	अहिर, यादव, ग्वाला
11)महाराष्ट्र	-	धनगर, करवर, कुबा, गडदीया, गडदी, हटकर इ.

वरील विश्लेषणावरून लक्षात येते की, धनगर जातीला वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळी नावे आहेत. भारतातील धनगर समाज हा मागासलेल्या प्रवर्गात समाविष्ट आहे. काही राज्यांत हा अनुसूचित जमातींमध्ये समाविष्ट होतो. महाराष्ट्रात धनगर समाज हा भटक्या जमातीत प्रविष्ट आहे. धनगरांमध्ये मराठी धनगर व परदेशी धनगर असे प्रमुख भेद आहेत. परदेशी धनगर म्हणजे मुळचे इंदौरचे राज्यकर्ते व काही औरंगजेबासोबत मोहीमेवर सैन्य म्हणून आलेले व इकडेच स्थायिक झालेले होत. तसे पाहता महाराष्ट्रातील धनगर हटकर आणि खूटेकर हे दोनच प्रमुख उपप्रकार वा पोटजाती पडतात. तसे पाहता धनगर समाजात साडेबारा पोटजाती आहेत. त्या पुढीलप्रमाणे - (1) खुटेकर (2) हटकर (3) हत्ती काकण (4) सनगर (5) शेगर (6) अहेर (7) सोलाट (8) परदेशी (9) खिल्लारी (10) बनगर (11) तेलकर (12) डांगे आणि अर्धी जात पिंजारी मानली जाते.

समस्यासुत्रण आणि विषय निवडीचे महत्व

सामाजिक शास्त्रामध्ये अनेक जातींवर संशोधन झालेले आहे. इतिहासामध्येही सर्वसाधारणपणे बहुसंख्य जातींचे ऐतिहासीक पद्धतीने अध्ययन झालेले आहे. मात्र संख्येने जास्त असणाऱ्या धनगर समाजाच्या ऐतिहासीक दृष्टीकोनातून अभ्यास मात्र झालेला नाही. अशा संशोधनाच्याच क्षेत्रात उपेक्षीत राहीलेल्या धनगर समाजाचे 'महाराष्ट्रातील धनगर समाजाचे ऐतिहासीक अवलोकन' या संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून संशोधन करण्याचे ठरविले आहे. इतर क्षेत्रात वा विद्याशाखेत धनगरांच्या इतर बाजूंवर संशोधन झालेले आहे. जसे की - त्यांचे सांस्कृतिक योगदान, आर्थिक स्थिती अशा बाजूंचा अभ्यास झाला; मात्र ऐतिहासीक वर्णनात्मक दृष्टीकोन समोर ठेऊन या समाजघटकाचा अभ्यास झालेला नाही. म्हणून या अभ्यासाच्या माध्यमातून ही राहीलेली उणीव भरून काढणे महत्वाचे वाटते. अशा प्रकारचा अभ्यास झाल्यास हे ही समोर येईल की, या समाजात काळानुसार कोणकोणते बदल होत गेले व का होत गेले. तसेच या समाजाची सद्यस्थिती काय आहे व त्यांच्यासमोर कोणकोणत्या समस्या वा अडचणी आहेत याचाही अभ्यास होईल. जे की अतिशय महत्वपुर्ण कार्य ठरेल.

विषयाची मर्यादा किंवा व्याप्ती

धनगर समाज हा संपुर्ण भारतभर पसरलेला आहे. परंतु वेगवेगळ्या राज्यांमधील धनगर समाजाच्या संस्कृती, राहणीमान, व्यवसाय, श्रद्धास्थाने यांच्यामध्ये कमालीचे अंतर आहे. एवढेच नाही तर भाषेमध्ये आणि बोलीभाषेमध्येही फरक आहे. सामाजिक आरक्षणाचा विचार केला तर हा समाज काही राज्यात भटक्या जमातीमध्ये मोडतो तर काही राज्यात हाच समाज अनुसूचित जमातीमध्येही मोडतो. यावरून या समाजात असलेल्या वैविध्याचा बोध होतो. म्हणून संपूर्ण धनगर समाजाचा एकत्रीतरीत्या अभ्यास करणे शक्य नाही. व तशा प्रकारचे संशोधन होने ही खूपच व्यापक व खर्चिक बाब आहे. त्यामुळे प्रस्तूत संशोधन प्रकल्पाची विषय मर्यादा ठरवून घेताना महाराष्ट्रातील धनगर समाजाचे ऐतिहासीक अवलोकन अशी व्याप्ती व मर्यादा या संशोधन प्रकल्पाला आखून घेतलेली आहे. ज्यामद्ये महाराष्ट्रातील धनगर समाजातील पोटजातींचाही समावेश असेल.

विषयाचे पुर्वसंशोधन

प्रस्तूत संशोधन विषयासंबंधी अनेक विद्वानांनी संशोधन केले आहे. पण ते या संशोधन प्रकल्पापेक्षा वेगळे आहे.

'महाराष्ट्रातील धनगर संशोधन योजना - 1969' - इरावती कर्वे : या प्रकल्पासाठी इरावती कर्वे यांना शासनाकडून अडीच लाखांचा निधी मंजूर झाला होता. पण हा प्रकल्प पुर्ण होण्याअगोदरच इरावती कर्वेंचा आकस्मात मृत्यू झाला. पुढे हे कार्य त्यांचे शिष्य डॉ. डिंगरे यांनी केले.

जर्मनीतील हायडेलबर्ग विद्यापीठातील प्राध्यापक गुन्थर सोनथायमर यांनी महाराष्ट्रात राहून धनगर लोकांच्या सहवासात राहून त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास केला व संशोधन केले.

प्रा. डॉ. शिवाजी दळणार यांनी परभणी जिल्हयातील धनगर समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. साठी सादर केलेला शोधप्रबंध देखीली महत्वपुर्ण आहे.

डॉ. शामसिंह शशी यांनी त्यांच्या 'दि शफर्ड्स ऑफ इंडीया' या प्रबंधात धनगर समाजाच्या विविध पैलूंचे अध्ययन केले आहे.

असे असले तरीही या सर्व संशोधकांच्या संशोधनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील धनगर समाजाचे ऐतिहासीक अवलोकन आजवर कोणत्याही संशोधकाने केले नाही.

संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये

1) महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या सामाजिक स्थितीची ऐतिहासीक दृष्टीकोनातून मीमांसा करणे.
2) महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक स्थितीचे ऐतिहासीक पद्धतीने परीक्षण करणे.
3) महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या आर्थिक स्थितीचा ऐतिहासीक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.
4) धनगर समाजाच्या सद्यस्थितीचा व त्यांच्या समोरील आव्हानांचा अभ्यास करणे.
5) महाराष्ट्रातील धनगर समाज व भारतातील इतर राज्यांतील धनगर समाज यांच्या संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधन विषयाची गृहीतके

1) महाराष्ट्रातील धनगर समाजाचा ऐतिहासीक पद्धतीने अभ्यास झाल्यास या समाजाच्या समस्यांचा शोध घेणे शक्य आहे.

2) भारतातील इतर राज्यांतील धनगर समाज आणि महाराष्ट्रातील धनगर समाज यांच्यातील फरक समजणे शक्य होईल.

संशोधन पद्धती

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयाच्या ज्या संशोधन पद्धती सांगितल्या गेल्या आहेत त्यात -

वर्णनात्मक विश्लेषण पद्धती, सर्वेक्षण पद्धती, मुलाखत संशोधन पद्धती, प्रश्नावली संशोधन पद्धती या पद्धती आहेत. माझा विषय हा सामाजिक असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक विश्लेषण पद्धती, सर्वेक्षण पद्धती, संदर्भ संशोधन पद्धत या पद्धतींचा अधिकात अधिक वापर करण्यात येईल.

तथ्य संकलनाचे स्त्रोत

1) प्राथमिक साधने : धनगर समाजाचे राहणीमान, रुढी परंपरा, व्यवसाय, कौटूंबिक स्थिती इ. चे सखोल अध्ययन करण्यासाठी प्रश्नसुची तयार केली जाईल व त्याच्या माध्यमातून मुलाखती घेतल्या जातील.
2) दुय्यम साधने : दुय्यम साधनांचा वापरही या संशोधनासाठी करण्यात येईल. धनगर समाजातील मेळावे, मासिके, धनगर समाजातील परिषदा, समाजावरील वृत्तपत्रांत आलेले लेख, पुस्तके, जनगणना अहवाल, महाराष्ट्र राज्य गॅझेट व इतर अभ्यासकांनी केलेले संशोधन यांचा वापर करण्यात येईल.

प्रकरण योजना

प्रकरण पहिले - महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या सामाजिक स्थितीचे ऐतिहासीक दृष्टीकोनातून परीक्षण

या प्रकरणात महाराष्ट्रातील धनगर समाजाचे सामाजिक अध्ययन केल्या जाईल. भूतकाळातली धनगर समाजाची स्थिती व सद्यस्थिती यांचा तुलनात्मक अभ्यासही यात केला जाईल.

प्रकरण दुसरे - महाराष्ट्रातील धनगर समाजाची धार्मिक व सांस्कृतिक स्थिती : एक अभ्यास

या प्रकरणात महाराष्ट्रातील धनगर समाजाची धार्मिक स्थिती, सण उत्सव, परंपरा आदिंचा अभ्यास केला जाईल तसेच जाती व पोटजातींमधील सांस्कृतिक फरकांचाही अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण तिसरे - महाराष्ट्रातील धनगर समाजाची आर्थिक स्थिती

या प्रकरणात महाराष्ट्रातील धनगर समाजाची आर्थिक परिस्थितीत, व्यवसायात काळानुरुप कोणते बदल होत गेले व ते बदल होण्यापाठीमागच्या कारणांची कारणमीमांसा यात करण्यात येईल.

प्रकरण चौथे - महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणामध्ये धनगर समाजाची शैक्षणिक वाटचाल कशी होत गेली व सध्या स्थिती कशी आहे याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे - सद्यस्थिती व समाजासमोरील प्रश्न

या प्रकरणाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील धनगर समाजाचीस सद्यस्थिती कशी आहे याचा अभ्यास करण्यात येईल व या समाजासमोर कोणत्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्या आहेत, व त्या निर्माण होण्यापाठीमागची पार्श्वभूमी काय आहे याचा अभ्यास करण्यात येईल.

निष्कर्ष / उपसंहार

वरील संशोधन आराखड्याप्रमाणे संशोधन करून या आधारावर निष्कर्ष संपादीत करण्यात येतील.

प्रस्तूत संशोधन आराखडा हा पुर्णत: प्राथमिक स्वरुपाचा असून भविष्यात यामध्ये काही बदल करणे आवश्यक वाटल्यास तसा बदल करण्यात येईल.

संदर्भग्रंथ सुची

द्राक्षे प्रभाकर	-	महाराष्ट्रातील धनगर एक दर्शन, पुणे, 1994
मतकर गणेश	-	धनगर व धनगर समाज, अप्रकाशित लेख, 1990
लोही म. ना.	-	धनगर समाज : काल आणि आज, 1990
जाधव बी. ए.	-	औरंगाबाद तालुक्यातील धनगर समाजातील साक्षरता - एक अभ्यास, 1988
बळे बाळासाहेब	-	धनगरांचे देवता धुळोबा-भिवाया, 1989
शशी शामसिंह	-	दि शेफर्ड ऑफ इंडिया, 1978
सक्सेना आर. एन. & चिंचाळकर जे. एच.	-	Dhanagara’s and Hadriyans the most backward divisions of indian tribes and casts, 1976
कर्वे इरावती	-	महाराष्ट्रातील धनगर प्रोजेक्ट / योजना, 1969
बुचडे शं. ना.	-	धनगर समाजाचे ऐतिहासीक दिग्दर्शन
शं. बा. जोशी	-	मऱ्हाटी संस्कृती, 1952
सुमंत यशवंत	-	महाराष्ट्रातील जाती संस्थांविषयी विचार
आंबेडकर बी.आर., (म.अ.)अनुवादक चांगदेव खैरमोडे	-	शुद्र पुर्वी कोण होते ?
कोकर संजय	-	इतिहास धनगरांचा
कोळेकर गणपतराव	-	धनगर समाजाची गोत्रे
गायके तु. सं.	-	धनगरांची ओळख
एन्थोवेन आर. ई.	-	Tribes and castes of Bombay
पटवर्धन मो. वी.	-	वर्ण व जाती
आढाव बाबा	-	सत्यशोधनाची वाटचाल
गर्गे स. मा.	-	भारतीय समाज विज्ञान कोष
दळणार शिवाजी	-	परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन
आंबेडकर बी. आर. अनु.गाजरे मा.फ.	-	भारतातील जाती
ढेरे रामचंद्र चिंतामणी	-	दक्षिणेकडील लोकदैवत - खंडोबा
कोसंबी डी. डी.	-	Myth & Reality

खरे ग. ह. - महाराष्ट्रातील चार लोकदैवते

संशोधक
विकास शिवाजीराव ढाले

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सावंत यू. एस.
प्रोफेसर तथा विभाग प्रमुख
इतिहास विभाग व संशोधन केंद्र
यशवंत महाविद्यालय, नांदेड